01:21:56 PM

फौ.कि.अर्ज क्र.७१/२०१६
कमल वि. कचरु
निशाणी २८ लगत

**गैरअर्जदारातर्फे सा.क्र.१ याचा उलटतपास अर्जदारातर्फे विधिज्ञ श्री.बी.जे.चव्हाण यांच्यामार्फत**

२. मी सध्या बाजार सांवगी येथे महावितरण खात्यामध्ये कामाला आहे. मला दोन मुलं आहेत. माझ्या मुलीचे लग्न झालेले आहे. तिच्या लग्नाला मी होतो. मुलीच्या लग्नाचा खर्च मी माझ्या पत्नीला दिलेला नाही. साक्षीदार सांगतो की, आहेर केला होता. हे खरे आहे की, माझ्या पत्नीने मुलीच्या लग्नाचा खर्च केला. माझा मुलगा बारामती अॅग्रो येथे कारखान्यात कामाला होता. मी बारामती अॅग्रो येथे गेलो नव्हतो. माझ्या मुलाचे शैक्षणिक कागदपत्र मी पाहिलेली नाही. माझा मुलगा कारखान्यात कोणत्या पदावर काम करतो हे मला सांगता येणार नाही. हे खरे आहे की, मी मुलाचे पगारपत्रक कधी पाहिलेले नाही. हे खरे आहे की, माझ्या सरतपासात मी तोंडी माहितीच्या आधारे मजकूर लिहलेला आहे.

३. माझी पत्नी कोणाकडे कामाला जाते याची मला माहिती नाही. तिला लाडकी बहिण योजनेचे पैसे मिळतात याची मी पडताळणी केली नाही. माझ्या पत्नीला ३० हजार रुपये उत्पन्न मिळते हे मी ऐकीव माहितीवरुन सांगतो. मला नोकरीला लागून २५ ते ३० वर्ष झाले. मला आजघडीला १० ते १५ हजार रुपये पगार मिळतो. माझा एकूण पगार ३० ते ३२ हजार रुपये आहे. माझे आताचे पद मदतनीस म्हणून आहे. माझे पगारातून अंदाजे १५ ते २० हजार रुपये कपात होतात.

४. माझा पुतण्या आणि मी वेगवेगळे राहतो. हे खरे नाही की, माझ्या पत्नीचे नाव मी सेवा पुस्तकाला नामनिर्देषित केले होते. हे खरे नाही की, माझ्या पत्नीचे नाव कमी करुन माझ्या पुतण्याचे नाव लावले होते. साक्षीदार सांगतो की, ऑफिसवाल्याने केले. हे खरे नाही की, बाजार सांवगी येथे आमची वडिलोपार्जित जागा आहे. हे खरे नाही

की, बाजार सांवगी येथे माझ्या नावे गट क्र.३२२ मध्ये ३९ आर क्षेत्र आहे. हे खरे नाही की, ती जागा गावठाण झालेली आहे.

५. शांताबाई माझी दुसरी पत्नी आहे. हे खरे आहे की, ती घरकाम करते व ती नोकरीला नाही. शांताबाई ही सहावी ते सातवीपर्यंत शिकलेली आहे. हे खरे नाही की, बाजार सांवगी येथे गट क्र.३५० मध्ये ८०.५० चौ.मी. मी शांताबाईच्या नावे विकत घेतलेली आहे. साक्षीदार सांगतो की, तिच्या वडीलांनी विकत घेतलेली आहे. शांताबाईचे वडील आता हयात नाही. त्यांना मयत होवून ७ ते ८ वर्ष झालेले आहे. प्लॉटच्या खरेदीची तारीख मला सांगता येणार नाही. मला वाचता येते. निशाण ३१ येथील अनु.क्र.१ येथे असणारे दस्त क्र.२८४/२०२३ दाखविण्यात आला. हे खरे आहे की, सदर खरेदीपत्रान्वये माझ्या पत्नीच्या नावे खरेदी करण्यात आलेली आहे. हे खरे आहे की, त्यावर माझी साक्षीदार म्हणून सही आहे. हे खरे आहे की, माझे सासरे वारल्यानंतर सदर खरेदीपत्र झालेले आहे. सदर खरेदीपत्र साक्षीदाराला मान्य असल्यामुळे त्याला **निशाण क्र.३२** देण्यात येते. हे खरे नाही की, सदर मिळकत माझ्या पगाराच्या पैशातून विकत घेतलेली आहे.

६. हे खरे आहे की, माझ्या पत्नीने अंबड येथील न्यायालयात पोटगीचे प्रकरण दाखल केले होते. हे खरे आहे की, सन २०१३ मध्ये अंबड न्यायालयाचा प्रकरण क्र. १०१/२०१० मध्ये झालेल्या निर्णयाबाबत मी जालना येथे दाद मागितली. हे खरे आहे की, त्या प्रकरणामध्ये प्रत्येकी १,५००/- रुपये पोटगी देण्यात आली. हे खरे आहे की, त्यानंतर आजपर्यंत वाढीव पोटगीची रक्कम मागण्यात आलेली नाही. हे खरे आहे की, २०१३ पासून आणि २०२६ पर्यंत महागाईत वाढ झालेली आहे. हे खरे नाही की, मी ५ ते ६ वर्ष कोर्टात हजर झालो नाही व पोटगीही भरली नाही. हे खरे नाही की, मुलीच्या लग्नामुळे माझ्यावर भरपुर कर्ज झालेले आहे. सोसायटीचे कर्ज मी कशाकरीता काढले होते हे मला जास्त दिवस झाल्यामुळे मला सांगता येणार नाही. त्याची परतफेड अजून चालू आहे. मी ५ ते ६ लाख रुपये कर्ज काढले होते. मी त्याबाबत कागदोपत्री पुरावा सादर करु

शकत नाही. हे खरे आहे की, माझ्या पत्नीला १,५००/- रुपये पोटगी आता पुरत नाही. हे खरे आहे की, मुल सज्ञान झाल्यामुळे त्यांची पोटगी बंद झालेली आहेत. मला हे सांगता येणार नाही की, माझा मुलगा काय कामधंदा करतो. हे खरे नाही की, मला एक लाखाच्या वर पगार मिळतो. हे खरे नाही की, मी नोकरीला लागल्यापासून ५ ते ६ वेळेस पगारवाढ झाली होती. हे खरे नाही की, पत्नीला जास्त पोटगी द्यायला लागू नये म्हणून खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, खोट्या आशयाचे शपथपत्र दाखल केलेले आहे. हे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2026.03.18 16:50:10 +0530

(वि. द. पाटील)

दि.१८/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

01:54:40 PM कन्नड

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Vishnu D. Khambat, (Grade-III) |
| Court | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 18.03.2026 |
| Order signed by the Presiding Officer | 18.03.2026 |
| Order uploaded on | 18.03.2026 |